सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

## आरोग्य विभागांतर्गत गट-क संवर्गातील वाहनचालक पदाच्या निकालाबाबत सुचना

आरोग्य विभागातील गट क मधील वाहनचालक संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता ०८ जानेवारी २०१७ लेखी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत ४५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या जाहिरातीत नमूद सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय रिक्त पदांच्या १:५ या प्रमाणात गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करुन त्यांची ४० गुणांची व्यावसायीक चाचणी परीक्षा उपसंचालक आरोग्य सेवा (परीवहन), पुणे यांचे मार्फत दिनांक १८ सप्टेंबर ते २० सप्टेंबर, २०१७ या कालावधीत पुणे येथे घेण्यात आली.

व्यावसायीक चाचणी परीक्षेत एकुण ४० गुणांच्या किमान ४० टक्के गुण प्राप्त केलेल्या म्हणजेच किमान १६ गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांना पात्र ठरविण्यात आले आहे. ज्या उपस्थित उमेदवारांना ४० गुणांच्या व्यावसायीक चाचणी परीक्षेत किमान १६ गुण प्राप्त झाले आहेत अशा उमेदवारांची लेखी परीक्षेत व व्यावसायीक चाचणी परीक्षेत मिळालेले गुण एकत्र करुन गुणवत्ता यादी तयार करण्यात आली आहे. सदर यादी आरोग्य विभागाच्या http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर गुणवत्ता यादीच्या आधारे सामाजिक व समांतर आरक्षण निहाय रिक्त पदे विचारात घेऊन निवड याद्या तयार करण्यात आल्या असून सदर याद्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या http://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

गुणवत्ता यादीत ज्या उमेदवारांना समान गुण प्राप्त झाले आहेत अशा उमेदवारांचे बाबतीत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:प्रनिमं-१२१५/(प्र.क्र. ५५/१५)/१३-अ, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१५ नूसार कार्यवाही करण्यात आली आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : 23/10/2017.

संचालक,
आरोग्य सेवा, मुंबई.